# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ ७५/२०१४-१५/२५७ दिनांक : ११.१२.२०१४

**<u>आदेश केस क्र. ७५/१४-१५</u>**

श्री. बाळासाहेब श्रीपाल रुग्गे,
१४/५७९, रुग्गे मळा, इचलकरंजी,
जि.कोल्हापूर. — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता, — विरुध्द
पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इचलकरंजी.

३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय अ, इचलकरंजी.

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री.जी.बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. बाळासाहेब श्रीपाल रुग्गे, १४/५७९, रुग्गे मळा, इचलकरंजी यांनी वितरण कंपनी, इचलकरंजी अ उप विभाग यांचेविरुध्द मंचाकडे दि.२९.१०.२०१४ रोजी तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**तक्रारीचे स्वरुप**

अर्जदार यांनी वितरण कंपनीच्या उपविभागाकडे दि.०७.११.२०१३ रोजी शेतीपंपाच्या नवीन कनेक्शनसाठी अर्ज दिला. वितरण कंपनीने दि. ०६.०३.२०१४ रोजी चलन दिले. सदर चलन दि. २१.०३.२०१४ रोजी भरले. चलन मिळण्यास विलंब झाल्यामुळे भरपाई मिळावी, लवकरांत लवकर वीज जोडणी मिळण्याबाबतचे आदेश व्हावेत अशी मागणी मंचाकडे केली. दि. ०६.०६.२०१४ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर येथे क्ष फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने कोणताही आदेश पारित केला नाही.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि.२०.११.२०१४ रोजी घेण्यात आली. तक्रारदार स्वतः हजर. वितरण कंपनीतर्फे श्री.आरळी, उप कार्यकारी अभियंता व श्री. जाधव, अतिरिक्त कार्यकारी अभियंता हे उपस्थित होते. सदर तक्रारीवरील लेखी निवेदन दि. १३.११.२०१४ मंचास सादर केले.

तक्रारदाराने दि. ०७.११.२०१३ रोजी ५ अश्वशक्ती शेतीपंपासाठी वीज मागणी अर्ज सादर केला आहे. ग्राहकाने दि. २१.०३.२०१४ रोजी चलन भरलेले आहे. सदर ग्राहकाचा पेड पेडींग यादीतील नंबर १३ असून स्वतंत्र शेती वाहिनीवरुन विद्युत कनेक्शन देणेसाठी लागणारी एचटी लाईन २.४ कि.मी., १०० केव्हीए रोहित्र व ०.२८ कि.मी. एलटी लाईन इ.ची उभारणी करणे आवश्यक आहे. सदर काम पेड पेडींग यादीतील क्रमांक ४ चे काम झाल्यानंतर मंजूर करण्यात आले आहे. क्र. ४ च्या ग्राहकासाठी एचटी लाईनचे काम मे. चित्रा इलेक्ट्रीकल यांना देण्यात आलेले असून एचटी लाईनचे काम करतेवेळी ROW right of way न मिळाल्यामुळे प्रलंबित आहे. एचटी लाईन व रोहित्राचे काम लवकरात लवकर करणेसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. गावठाण फिडरवरुन सदरील कनेक्शन जवळ असून देखील ते कंपनीच्या परिपत्रकाप्रमाणे देता येणार नाही. तसे परिपत्रक क्र. १७८ दि. ३०.०९.२००८ मंचास सादर केले. लाईन उभा करतांना ज्या व्यक्तीकडून हरकत घेण्यात येत आहे, अशा व्यक्तींना हे प्रलंबित ग्राहक व विद्युत कंपनीचे अधिकारी हे भेटून वाद मिटविण्याचा प्रयत्न करणार आहोत असे मंचास सांगितले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकास ठराविक मुदतीत विद्युत कनेक्शन देणेबाबतचा आदेश देणे योग्य होईल काय ?
उत्तर : नाही
२) वितरण कंपनीकडून चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी भरपाई देणे बाबत आदेश देणे योग्य होईल काय ?
उत्तर : नाही

**कारणमिमांसा**

सुनावणी दरम्यान वि.प.ने केलेल्या अभिकथनानुसार तक्रारदाराच्या नवीन कनेक्शनसाठी मंजुरी देऊन काम करण्यासाठी मे. चित्रा इलेक्ट्रीकल या कंत्राटदारास सांगितल्याचे दिसून येते. सदरील ग्राहकास जेथून लाईन येणार आहे, त्या ग्राहकासाठी पोल उभे करण्याचे काम चालू असल्याचे दिसते. परंतु सदर ग्राहकासाठी ३ पोल उभे केले असतांना पुढील पोल उभे करण्यासाठी कांही जमीन मालक व्यक्तींनी हरकत घेतल्यामुळे काम बंद पडल्याचे निदर्शनास येते. वितरण कंपनीने सांगितल्याप्रमाणे वाद मिटविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

सदर वाद सामोपचाराने मिटल्यानंतर तक्रारदाराच्या कनेक्शनचे काम हाती घेऊन लवकरात लवकर पूर्ण करुन देण्यात येत आहे. अशा परिस्थितीत ठराविक मुदतीत कनेक्शन देणेबाबत मंचाकडून आदेश देणे योग्य होणार नाही, कारण वाद वेळेवर मिटला नाही तर वितरण कंपनीस प्रसंगी पोलीस संरक्षण घेणे आवश्यक होऊ शकते. तसेच ग्राहकाने सदर कनेक्शन गावठाण फिडरवरुन जवळ असल्यामुळे मिळावे अशी सुनावणी दरम्यान मागणी केली होती, परंतु महावितरणचे दि. ३०.०९.२००८ च्या परिपत्रकानुसार जे अधिकारी गावठाण फिडरवरुन शेतीपंपाचे कनेक्शन देतील, त्यांना कंपनीच्या सेवेतून बडतर्फ करण्याची कारवाई करण्यात येईल या भितीने अधिकारी नवीन वीज जोडणी देण्यास तयार नाहीत हे स्पष्ट होते. त्यामुळे गावठाण फिडरवरुन विद्युत जोडणी देण्याबाबतचे आदेश देणे संयुक्तिक होणार नाही. **म्हणून प्रश्न क्र. १ चे उत्तर " नकारार्थी "** देणेत येत आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग कृती मानके विनियम २०१४ हे दि. २०.०५.२०१४ पासून लागू करण्यात आलेले आहेत. त्यानुसार चलनाच्या विलंबापोटी भरपाई मागणीसाठीचा अर्ज संबंधित कार्यालयाकडे म्हणजे उप विभागीय कार्यालयाकडे मुदतीत करणे आवश्यक आहे. तसा अर्ज दिल्याचे ग्राहकाने सुनावणी दरम्यान स्पष्ट केले नाही. कृती मानके विनियम २०१४ चे अवलोकन करुन त्यांनी अर्ज वितरण कंपनीकडे करावा. विनियमातील तरतुदीनुसार भरपाई देणेबाबतचा आदेश मंचास देता येणार नाही. **म्हणून प्रश्न क्र. २ चे उत्तर " नकारार्थी "** देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१. वितरण कंपनीने लाईन उभी करण्यासाठी येणाऱ्या हरकती लवकरात लवकर मिटवून तक्रारदारास कनेक्शन देण्याची कार्यवाही करावी.

२. वितरण कंपनीने ग्राहकास चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी भरपाईची मागणी फेटाळण्यात येत आहे. चलन व वीज जोडणीस झालेल्या विलंबापोटी ग्राहक स्वतंत्ररित्या वितरण कंपनीकडे भरपाईसाठी अर्ज करु शकतो.

३. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा.विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-

दिनांक : (जी.बी. पानकर)

सदस्य सचिव

बी.जी. पवार, अध्यक्ष : सही/-

एकमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.